07-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/06/2025 11:41 PM Page 1



हरमल किनाऱ्यावरील आणखी ३ बांधकामे जमीनदोस्त » पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड




२५ वर्षांपूर्वीच्या पराभवाची भारत परतफेड करणार? » पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, ७ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 183 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 7 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# चीनने दिला अमेरिकेला खुन्नस!


## कोणत्याही संघर्षाला तयार | चीनी वस्तूंवरील आयात शुल्क वाढवण्याच्या ट्रम्प यांच्या निर्णयावर चीनकडून थेट धमकी !

**वुहान, दि. ६ : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनी वस्तूंवरील आयात शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर चीनने कठोर प्रतिक्रिया दिली आहे. अमेरिकेला कोणत्याही प्रकारच्या संघर्षास सामोरे जाण्यास तयार राहावे लागेल, असा इशारा चीनने दिला आहे.**

ट्रम्प प्रशासनाने सर्व चीनी वस्तूंवर टॅरिफ वाढवण्याचा निर्णय घेतल्याने जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यानंतर चीनने तातडीने अमेरिकन कृषी उत्पादनांवर १० ते १५ टक्के अतिरिक्त शुल्क लागू करण्याची घोषणा केली.मंगळवारी चिनी दूतावासाने सोशल मीडियावर पोस्ट करत अमेरिकेला स्पष्ट इशारा दिला की, ते व्यापार युद्ध असो, टॅरिफ युद्ध असो किंवा कोणतेही अन्य आव्हान असो, चीन शेवटपर्यंत लढण्यास तयार आहे.

बुधवारी चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनी २०२४-२५ या वर्षासाठी संरक्षण खर्चात ७.२ टक्के वाढ करण्याची घोषणा केली. ली कियांग म्हणाले, जागतिक परिस्थितीत वेगाने बदल होत आहेत, आणि चीनला त्यानुसार सज्ज राहावे लागेल. संरक्षण अर्थसंकल्पातील ही वाढ गेल्या वर्षीच्या अंदाजाशी सुसंगत असल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे.बीजिंगमधील वरिष्ठ नेते देशांतर्गत जनतेला हा विश्वास देण्याचा प्रयत्न करत आहेत की व्यापार युद्ध आणि जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवरही चीनची अर्थव्यवस्था वृद्धिंगत होऊ शकते. दुसरीकडे, अमेरिका आणि चीन यांच्यातील तणावाचे परिणाम जागतिक बाजारपेठांवरही उमटण्याची शक्यता आहे.

अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेट यांनी या स्थितीवर प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले की, अमेरिका कोणत्याही आव्हानास सामोरे जाण्यास पूर्णपणे तयार आहे. शांतता राखण्यासाठीही ताकद आवश्यक असते, आणि त्यामुळे आमचे सैन्य सशक्त करण्यावर भर दिला जात आहे. हेगसेट पुढे म्हणाले, चीन आपल्या लष्करी सामर्थ्यावर मोठ्या प्रमाणावर खर्च करत आहे. मात्र, अमेरिकेचे सामर्थ्य अधिक असून आम्ही जागतिक शांतता टिकवण्यासाठी सक्षम आहोत.





चीनचे वार्षिक संरक्षण बजेट २४५ अब्ज डॉलर्स इतके असून, ते जगातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे संरक्षण बजेट आहे. तथापि, हे अमेरिकेच्या ८८६ अब्ज डॉलर्सच्या तुलनेने एक तृतीयांश आहे. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार, चीन आपल्या जीडीपीच्या १.६ टक्के हिस्सा संरक्षणावर खर्च करतो, जो अमेरिका आणि रशियाच्या तुलनेने कमी आहे. विश्लेषकांचे मत आहे की, चीन त्याच्या संरक्षण खर्चाचे अधिकृत आकडे कमी दर्शवतो. २०५० पर्यंत चीन जागतिक दर्जाचे लष्कर उभारण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे साऊथ चायना मॉर्निंग पोस्टच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

अमेरिकेच्या अंदाजानुसार, चीनकडे सध्या ५०० हून अधिक अण्वस्त्रे असून, २०३० पर्यंत हा आकडा १००० पर्यंत जाऊ शकतो. तुलनात्मकदृष्ट्या, अमेरिका आणि रशियाकडे ५००० हून अधिक अण्वस्त्रे आहेत. चीनच्या लष्करी आधुनिकीकरणाला वेग येत असून, नौदल आणि वायुदलाच्या बळकटीकरणावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. सध्या, पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) कडे २५.४५ लाख सैनिक आहेत, तर नौदलात ३.८ लाख आणि हवाई दलात ४ लाख कर्मचारी कार्यरत आहेत.

ग्लोबल फायर पॉवरच्या २०२५च्या अहवालानुसार, अमेरिका जागतिक स्तरावर सर्वात बलाढ्य लष्करी शक्ती आहे. अमेरिकेकडे १३,०४३ विमाने, ११ विमानवाहू युद्धनौका आणि ७० पाणबुड्या आहेत. त्याच वेळी, चीन या यादीत तिसऱ्या क्रमांकावर असून, त्याच्या नौदलात तीन विमानवाहू युद्धनौका आणि ६१ पाणबुड्या आहेत. चीनच्या लष्करी शक्तीत झपाट्याने वाढ होत असली तरी अमेरिकेच्या तुलनेत तो अजूनही मागे आहे.

ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांमुळे चीन आणि अमेरिकेतील तणाव वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. विशेषतः, व्यापार युद्धाचे परिणाम मेक्सिको आणि कॅनडासारख्या अमेरिकेच्या भागीदार देशांवरही जाणवू शकतात. तणाव अधिक वाढल्यास जागतिक अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

अमेरिका आणि चीन यांच्यातील संबंध नेहमीच तणावपूर्ण राहिले आहेत. संरक्षण, व्यापार आणि भूराजकीय समीकरणांमधील बदलांमुळे भविष्यात या दोन्ही महासत्तांमधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. या स्थितीचा जागतिक स्थैर्यावर काय परिणाम होईल, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

# काशिनाथ शेट्येंना वीजमंत्र्यांचे समर्थन

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ६ : सध्या राज्यभर चर्चेत असलेले वीज विभागाचे कार्यकारी अभियंता काशिनाथ शेट्ये यांच्या निर्णयाचे अखेर वीजमंत्री सुदिन ढवळीकर यांनी समर्थन केले आहे. शेट्ये हे जबाबदार अधिकारी असून ते चांगले काम करीत आहेत, असे ढवळीकर यांनी म्हटले आहे. मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर आणि शेट्ये यांच्यातील वादाबद्दल फार काही भाष्य न करता शेट्ये यांनी वीज विभागाची मालमत्ता सुरक्षित राखण्याच्या उद्देशानेच काम केले, असेही मंत्री ढवळीकर यांनी म्हटले आहे.





वीज विभागाचे नुकसान भरून काढण्यासाठी फुकट्या आणि बेकायदेशीर केबल तसेच इंटरनेट सेवा पुरवठादारांना नियमाच्या कक्षेत आणून कारवाई करू पाहणारे कार्यकारी अभियंता काशिनाथ शेटये यांना केबल ऑपरेटर्स लॉबीच्या दबावाखाली येऊन मुख्यमंत्र्यांनी या मोहिमेवरून दूर केले असे आरोप सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर वीजमंत्री सुदिन ढवळीकर यांनी अखेर याबाबतीत आपले मौन सोडले. काशिनाथ शेट्ये आतापर्यंत अतिशय चांगले काम करीत असून यांना कर्तव्यमुक्त केलेले नाही, असे ढवळीकर यांनी स्पष्ट केले. शेट्ये कार्यकारी अभियंता आहेत आणि कार्यकारी अभियंत्याला असलेले सगळे अधिकार त्यांना आहेत. त्यामुळे त्यांनी आपल्या अधिकारांचाच वापर केला आहे. काढण्यात आलेल्या केबल्स पुन्हा जोडू देण्याचा निर्णय हा मुख्यमंत्री आणि मी मिळून घेतला, असे मंत्री ढवळीकर यांनी म्हटले आहे. थकबाकीदारांकडचे काही पैसे भरून घ्यावेत आणि सेवा पूर्ववत करावी, असे ठरल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे ते म्हणाले. मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर आणि शेट्ये यांच्यातील वाद आणि एकमेकांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याच्या इशाऱ्यांबद्दल विचारले असता ढवळीकर यांनी थेट उत्तर देणे टाळले. मात्र, वीज विभागाच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याच्या उद्देशानेच शेट्ये त्याठिकाणी गेले होते, असे स्पष्ट केले.

दुसरीकडे, वीज विभागाच्या कारभाराबद्दल बोलताना ढवळीकर म्हणाले की, विभागाचा दर्जा बी पासून बी प्लस आणि आता ए पर्यंत गेला आहे. यामध्ये आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांचे योगदान आहे. आमचे नुकसान आहे ते आता ८.३ टक्क्यावर आले आहे. हे आणखी कमी करण्यासाठी आमचे अधिकारी आणि तंत्रज्ज्ञ झटत आहेत. अभियंत्यांच्या कामगिरीमुळे त्यांच्या विभागाने चांगले काम केले आहे, असेही त्यांनी सांगितले.

# उच्च न्यायालयाची राज्य सरकारला नोटीस

## पंचायतघर, क्रीडा मैदान उभारण्यासाठी खासगी जमीन संपादित केल्याचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६ :** मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार व इतर संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. ही नोटीस, बेती ग्रामपंचायत क्षेत्रातील खासगी जमीन आणि पंचायतघर, क्रीडा मैदान उभारण्यासाठी संपादित केल्याच्या आरोपावरून जारी करण्यात आली आहे.

याचिकाकर्ते एगिडियो जोस नाझियाझेनियो ब्रागांझा यांनी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेनुसार, सर्वेक्षण क्रमांक २१/२ मधील ३३५ चौरस मीटर आणि सर्वेक्षण क्रमांक २२/१९ मधील १८१ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या त्यांच्या जमिनीचा कोणताही अधिकृत भूसंपादन प्रक्रिया न करता आणि भरपाई न देता अवैधरीत्या ताबा घेतल्याचा आरोप आहे.

ब्रागांझा यांनी न्यायालयात सादर केलेल्या याचिकेनुसार, २१ जानेवारी १९९७ रोजी तिसवाडी-पणजी येथील ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर (बीडीओ) यांनी भूसंपादन कायदा, १८९४ च्या कलम ६ अंतर्गत अधिसूचना जारी केली होती. यामध्ये बेतीतील सर्वेक्षण क्रमांक १९/१ (भाग), २१/१ (भाग), २१/३ (भाग), २१/४ (भाग), २१/५ (भाग) आणि २१/६ (भाग) मधील जमिनींच्या संपादनाचा समावेश होता.

मात्र, या अधिसूचनेमध्ये सर्वेक्षण क्रमांक २१/२ आणि २२/१९ या जमिनींचा उल्लेख नव्हता. तरीही, संबंधित सरकारी अधिकाऱ्यांनी या जमिनींचा ताबा घेतल्याचा आरोप आहे. याचिकाकर्त्याच्या मते, या जमिनींवर क्रीडांगण आणि ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यात आले असून, सध्या त्याचे व्यवस्थापन आणि देखरेख बेती ग्रामपंचायत करत आहे. जून २०२१ मध्ये ब्रागांझा यांनी आपल्या मालमत्तेच्या सर्वेक्षण क्रमांक २१/२ चा काही भाग बेकायदेशीरपणे कंपाऊंड वॉल वाढवून ताब्यात घेतल्याचे निदर्शनास आणले. कोविड-१९ महामारीच्या काळात ते मापुसा येथे वास्तव्यास असल्याने, या परिस्थितीचा फायदा घेत जमिनीवर अतिक्रमण केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

याचिकाकर्त्याने न्यायालयाकडे मागणी केली आहे की, संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या मालमत्तेवरील बेकायदेशीर ताबा त्वरित हटवण्याचे आदेश द्यावेत. तसेच, भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना (योग्य भरपाई व पारदर्शकता) कायदा, २०१३ अंतर्गत त्यांना योग्य भरपाई द्यावी. हे प्रकरण २ एप्रिल रोजी पुढील सुनावणीसाठी निश्चित करण्यात आले आहे.


# मडकईकरांच्या लाचखोरी आरोपांची चौकशी होणार का?

## चौकशीचे अधिकार पोलिसांना | ओळख पटवून दोषींवर कारवाई हवी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६ :** माजी मंत्री पांडुरंग मडकईकर यांनी त्यांच्या फाईल मंजुरीसाठी १५ ते २० लाखांची लाच दिल्याचा दावा केला असून, या प्रकरणाची चौकशी करण्याचे संपूर्ण अधिकार गोवा पोलिसांकडे आहेत. लाच घेतलेल्या मंत्र्यांची ओळख पटवून दोषींवर कारवाई करणे आवश्यक असल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

हेराल्ड मीडियाने याबाबत यांनी काही कायदेतज्ज्ञांशी संवाद साधला असता, मडकईकर यांच्या विधानाची चौकशी सुरू करणे आणि संबंधित कॅबिनेट मंत्र्याला उघड करणे हे पोलिसांच्या कार्यक्षेत्रात



येते, असे मत त्यांनी व्यक्त केले. माजी आमदार ॲड. राधाराव ग्रासियास म्हणाले, लाच मागणे आणि घेणे हा गुन्हा असला, तरी लाच देणे हा देखील कायद्याने गुन्हाच आहे. पोलिसांनी तत्काळ या प्रकरणाची चौकशी करून सत्य बाहेर आणले पाहिजे. जर मडकईकर यांनी लाच दिल्याचा दावा केला असेल, तर त्यांनी संबंधित मंत्र्याचे नाव जाहीर करणे गरजेचे आहे. अन्यथा पोलिस त्यांच्यावर खोटी तक्रार दिल्याचा गुन्हा दाखल करू शकतात.

मडगाव येथील ॲड. प्रीतम मोरेस यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या (१९८८) तरतुदी स्पष्ट करताना सांगितले, हा कायदा सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी कठोर तरतुदी प्रदान करतो. लाच घेणे आणि देणे या दोन्ही बाबी दंडनीय गुन्हे आहेत. यामुळे सरकारी अधिकाऱ्यांसह नागरिकांवरही जबाबदारी येते. पोलिसांनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी.

म्हापसा येथील ॲड. राजू पोळेकर यांच्या मते, सोशल मीडियावर व्यक्त केलेले विधान हे इलेक्ट्रॉनिक पुराव्याच्या श्रेणीत मोडते. जर माजी मंत्री मडकईकर यांनी सार्वजनिकरित्या हा आरोप केला असेल, तर पोलिसांनी स्वतः हून दखल घेऊन तपास सुरू करणे आवश्यक आहे. जर त्यांनी विधान मागे घेतले, तर प्रकरण स्थगित होऊ शकते, मात्र सत्य बाहेर यायला हवे.

ॲड. बाबू कोरगावकर यांनीही पोलिसांनी स्वतःहून दखल घेऊन मडकईकर यांना चौकशीसाठी पाचारण करावे, अशी मागणी केली. लाचखोरीचा आरोप हा गंभीर आहे. त्यामुळे पोलिसांनी मडकईकर यांच्याकडून अधिक माहिती घेऊन संबंधित मंत्र्याचे नाव उघड करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

माजी मंत्री आणि भाजप सदस्य असलेल्या पांडुरंग मडकईकर यांनी केलेल्या या विधानावर सरकार काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. जर हे आरोप सत्य असतील, तर दोषींवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. अन्यथा, खोटी माहिती पसरवण्याच्या आरोपावरून मडकईकर यांच्यावरही कारवाई होऊ शकते. गोवा पोलिस या प्रकरणाची अधिकृत दखल घेतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खाजगी कंपन्यांना नोकरभरतीची जाहिरात बंधनकारक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६ :** राज्य मंत्रिमंडळाने रोजगार विनिमय कायद्यात सुधारणा करण्यास मंजुरी दिली असून, याअंतर्गत खाजगी कंपन्यांना राज्यातील नोकऱ्यांच्या रिक्त जागांची जाहिरात करणे बंधनकारक असेल. नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधित कंपन्यांना ३० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री सावंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, सुधारित कायद्यानुसार, खाजगी कंपन्यांनी राज्यातील नोकरीच्या संधींबाबत प्राथमिकता देऊन जाहिराती प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. नियमांचे पालन न केल्यास पहिल्या उल्लंघनासाठी ५ हजार रुपये, दुसऱ्यांदा १० हजार रुपये आणि तिसऱ्यांदा १५ हजार रुपये दंड आकारला जाईल. विशेषत: ४०० हून अधिक कर्मचारी असलेल्या मोठ्या कंपन्यांना पहिल्या उल्लंघनासाठी २०हजार रुपये आणि त्यानंतरच्या उल्लंघनांसाठी ३० हजार रुपयांपर्यंत दंड भरावा लागेल. अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी कामगार निरीक्षकांची नियुक्ती केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. म्हापसा अर्बन बँकेच्या मालकीची नंदादीप इमारत २५ कोटी रुपयांना खरेदी करण्याच्या प्रस्तावासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे लिक्विडेशन प्रक्रियेत असलेल्या ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळण्यास मदत होईल.राज्य मंत्रिमंडळाने ८ मार्च रोजी श्री दत्त पद्मनाभ पीठाच्या सहकार्याने सद्‌गुरू फाऊंडेशनतर्फे शिरगाव येथील श्री देवी लईराई देवस्थान येथे आयोजित 'गोवा आध्यात्मिक महोत्सव २०२५' साठी १.५ कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीला मंजुरी दिली आहे.

## निवडक

### उदयनिधी स्टॅलिन यांना दिलासा

नवी दिल्ली, दि. ६ : सनातन धर्माबाबत वादग्रस्त टिप्पणी केल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांना दिलासा दिला. याप्रकरणी परवानगीशिवाय पुढील कोणताही गुन्हा दाखल केला जाणार नाही, तसेच उदयनिधी स्टॅलिन यांना अटकेपासून अंतरिम संरक्षण अबाधित राहील, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. उदयनिधी स्टॅलिन यांच्याविरोधात परवानगीशिवाय कोणताही गुन्हा दाखल केला जाणार नाही. तसेच त्यांना अटकेपासून देण्यात आलेले अंतरिम संरक्षण अबाधित राहील, असे सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे नेते उदयनिधी स्टॅलिन यांनी २०२३ मध्ये पत्रकार परिषद घेतली होती. यावेळी ते म्हणाले होते की, सनातन धर्म सामाजिक न्याय आणि समानतेच्या विरोधात आहे. त्याचे निर्मूलन करणे गजरेचे आहे. यावेळी त्यांनी सनातन धर्माची तुलना कोरोना विषाणू, मलेरिया आणि डेंग्यूशी करत त्यांनी तो नष्ट करायला हवे, असे म्हटले होते. यानंतर त्यांच्याविरोधात महाराष्ट्र, बिहार, जम्मू आणि कर्नाटकसह देशाच्या विविध भागात गुन्हे दाखल झाले होते.

---------

### शेतकऱ्यांचा मोर्चा पोलिसांनी रोखला

चंदिगड, दि. ६ : किमान हमीभावासह विविध मागण्यांसाठी सुरू झालेले शेतकऱ्यांचे आंदोलन आणखी चिघळण्याची शक्यता आहे. आज ट्रॅक्टर मोर्चा घेऊन चंदिगडमध्ये घुसण्यासाठी निघालेले शेतकऱ्यांचे वादळ चंदिगड पोलिसांनी पंजाब आणि चंदिगड सीमेवर रोखले. ठिकठिकाणी बॅरीकेड्स लावले. तसेच तब्बल १०० शेतकऱ्यांना अटक करण्यात आली. दरम्यान, आजपासून चंदिगडमध्ये धरणे आंदोलन सुरू करण्याची घोषणा शेतकऱ्यांनी केली होती. परंतु चंदिगड प्रशासनाने शेतकऱ्यांना चंदिगडमध्ये धरणे आंदोलनाची परवानगी नाकारली. मोहाली येथे रोपड जिह्यातून आलेल्या १०० शेतकऱ्यांना अटक करण्यात आली. त्यांचे १५ ट्रक्टर्सही ताब्यात घेण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी ट्रक्टरच्या नंबर प्लेटवर खुणा केल्या आहेत, जेणेकरून सीसीटीव्ही पॅमेऱ्याच्या माध्यमातून त्यांची ओळख पटवता येईल.

-------------

### अमेरिकेत तेलंगणाच्या विद्यार्थ्याची हत्या

तेलंगणा, दि. ६ : अमेरिकेत हिंदुस्थानी विद्यार्थ्यांचे हत्यासत्र सुरुच आहे. आता आणखी एका विद्यार्थ्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. तेलंगणातील रंगा रेड्डी जिल्ह्यातील विद्यार्थ्याची अमेरिकेत गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. जी. प्रवीण (वय - २७) असे विद्यार्थ्याचे नाव आहे. प्रवीण हा विस्कॉन्सिनमधील मिलवॉकी येथे उच्च शिक्षणासाठी गेला होता. शिक्षणाबरोबरच तो एका दुकानात पार्ट टाइम कामही करत होता. याच दुकानावर अज्ञात हल्लेखोरांनी दरोडा टाकला आणि त्यावेळी केलेल्या गोळीबारामध्ये प्रवीणचा मृत्यू झाला. बुधवारी सकाळी ही घटना घडली असून अमेरिकन अधिकाऱ्यांनी याबाबत मुलाच्या वडिलांना माहिती दिली. याबाबत मुलाच्या वडिलांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, आम्ही त्याच्या मित्रांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, प्रवीणची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे.

### हवामान

कमाल : ३७ किमान : २८

आर्द्रता : ६२

### बाजार भाव

सोने : ₹ ८८,४१० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ९८,३०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७२,३६५ .७७ ↑ (३१.१६)

निफ्टी : २२,२३५.९० ↑ (८३.९५)